# सहसंचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्रनिकेतन परीसर, सदर, नागपूर.

दुरध्वनी क्र.०७१२–६४६५१४६ E-mail:ronagpur.dte@gmail.com फॅक्स क्रं. ०७१२–२५६१६६३

कार्यालयीन आदेश (०८)

क्रमांक :— तंशिस/प्राकाना/शैवि/शैशुप्रतिपूर्ति/१२–१३/1146

दिनांक :— 23 APR 2012

विषय— खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायीक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती (ई.बी.सी)शैक्षणिक सत्र २०१०–११.

संदर्भ— (१) महाराष्ट शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र. टिईएम–२००७/(४९६/०७)/तांशि–१, दि. १०/१२/२००७

(२) शासन निर्णय क्र.टिईएम.२०१०/(१२५/२०१०)/तांशि–४,दि.०६/११/२०१०

(३) मा.संचालक, तंत्रशिक्षण,म.रा. मुंबई यांचे कार्यालयीन आदेश क्र १५/अर्थसं/ईबीसी/वितरण /२०१०–११ /४५, दि. १०/०३/२०११.

बरील संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारांचा बापर करुन सहसंचालक तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर हे त्यांचे अधिपत्याखालील निम्नदर्शित खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित पदवी /पदव्युत्तर पदवी व पदविका संस्थांमधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय (EBC) विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क समितीने मान्य केलेल्या **शैक्षणिक शुल्क (Tution Fees) च्या ५० टक्के** एवढी रक्कम निम्नदर्शित *विवरणाप्रमाणे शैक्षणिक सत्र २०१०–११ करीता वाटप करण्याबाबत मंजूरी देण्यांत येत आहे...*

| अ. क्र. | संस्था कोड | संस्थेचे नांव | शैक्षणिक वर्ष | अर्जांचा तपशिल | | | प्रतिपुर्तीची ५० टक्के रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अग्रेषित पैकी पुनश्च मंजूरी करीता प्राप्त अर्ज | मंजूर अर्ज | नामंजूर अर्ज | |
| | | **B.E.DEGREE** | | | | | |
| 01 | EN-4133 | The Principal, Smt. Radhikatai Pandav College of Engineering, Nagpur | 2010-11 | 12 | 11 | 01 | **2,09,023** |
| 02 | EN-4138 | The Principal J. D. College of Engineering, Nagpur | 2010-11 | 03 | 02 | 01 | **53,694** |
| 03 | EN-4141 | The Principal, Vilasrao Deshmukh College of Engineering and Tech., Nagpur | 2010-11 | 01 | 01 | 00 | **18,224** |
| 04 | EN-4145 | The Principal Wainganga College of Engineering and Management, Dongargaon, Nagpur | 2010-11 | 03 | 03 | 00 | **72,467** |
| 05 | EN-4164 | The Principal, Bapurao Deshmukh College of Engineering,Sewagram,Wardh | 2010-11 | 04 | 04 | 00 | **84,850** |
| 06 | EN-4166 | The Principal, K. D. K. Collelge of Engineering, Nagpur. | 2010-11 | 10 | 10 | 00 | **2,25,224** |
| 07 | EN-4176 | Guru Nanak Institute of Engineering & Technology, Nagpur | 2010-11 | 18 | 15 | 03 | **3,38,300** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 08 | EN-4188 | The Principal, Ballarpur Institute of Technology, Balapur, Dist Chandrapur | 2010-11 | 02 | 02 | 00 | **52,336** |
| 09 | EN-4196 | The Principal Gurunanak Institute of Engineering and Management, Nagpur | 2010-11 | 05 | 03 | 02 | **74,298** |
| | | **B.Pharma. Degree** | | | | | |
| 01 | PH-4208 | The Principal, Shri Sachhidanand Shikshan Sanstha College of Pharmacy, Nagpur | 2010-11 | 04 | 02 | 02 | **39,910** |
| | | **M.B.A. POST GRADUATE** | | | | | |
| 01 | MB-4147 | The Principal, K.D.K College of Engineering, Nagpur | 2010-11 | 01 | 01 | 00 | **23,364** |
| | | **M.C.A. POST GRADUATE** | | | | | |
| 01 | MC-4133 | The Principal, Smt.Radhikabai Pandav College of Engineering,Umrer Road, Nagpur | 2010-11 | 02 | 02 | 00 | **52,336** |
| | | **DIPLOMA POLYTECHNIC** | | | | | |
| 01 | D-4224 | The Principal, Shri Datta Meghe Polytechnic, Nagpur | 2010-11 | 02 | 02 | 00 | **41,264** |
| 02 | D-4231 | The Principal, Late Vasantdada Polytechnic, Nagpur | 2010-11 | 17 | 10 | 07 | **1,71,868** |
| 03 | D-4233 | The Principal, Priyadarshini Polytechnic, Nagpur | 2010-11 | 12 | 11 | 01 | **1,51,163** |
| 04 | D-4238 | The Principal, Shri Krushnarao Pandav Polytechnic, Nagpur | 2010-11 | 06 | 04 | 02 | **56,072** |
| 05 | D-4242 | The Principal, Mata Mahakali Polytechnic, Warora Dist- Chandrapur | 2010-11 | 21 | 15 | 06 | **2,10,000** |
| | | **DIPLOMA PHARMACY** | | | | | |
| 01 | D-4069 | The Principal, K.R.Pandav Institute of Pharmacy, Nagpur. | 2010-11 | 01 | 01 | 00 | **25,233** |
| | | **Total** | | **124** | **99** | **25** | **18,99,626** |

*( रुपये अठरा लाख नव्यांन्नव हजार सहाशे सव्वीस रुपये फक्त )*

उपरोक्त संस्था प्रमुखांनी खालील बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

१. शैक्षणिक सत्र २००९–१० साठी आपल्या संस्थेकरीता मंजूर झालेल्या व प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या ई.बी.सी. रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर करावे.

२. शैक्षणिक सत्र २०१०–११ साठी आपले कार्यालयाव्दारे या कार्यालयास सादर केलेल्या ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांनी २०१०–११ या शैक्षणिक सत्रात ई.बी.सी. या सवलती व्यतिरिक्त शासनाच्या इतर अन्य कोणत्याही सवलतींचा प्रत्यक्ष लाभ घेतलेला नाही अथवा मंजूर झाला नाही. अशा आशयाचे, तसेच मंजुर झालेल्या ई.बी.सी. रकमेचे अतिप्रदान झाल्याचे भविष्यात निदर्शनास आल्यास, झालेल्या अतिप्रदानाची एका हफ्यात वसुली भरण्यांत येईल असे प्राचार्यांचे स्वाक्षरीनिशी प्रमाणपत्र/हमीपत्र सादर करावे.

३. संबंधीत संस्था प्रमुखांनी वरील दोन बाबींची पुर्तता केल्यानंतरच त्यांना ई.सी.एस. / एन.ई.एफ टी. व्दारे मंजूर रक्कम वितरीत करण्यांत येईल. त्याकरीता संस्थेने त्यांच्या संस्थेच्या बॅक खात्याबाबतची माहिती विहित नमुन्यात या कार्यालयास तात्काळ सादर करावी. सदर नमुना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर **(www.rdtenagpur.org.in)** उपलब्ध आहे.

४. ई.सी.एस. / एन.ई.एफ टी. व्दारे मंजूर रक्कम प्राप्त झाल्यानंतर **संबंधीत लाभार्थी विद्यार्थ्यांना ई.सी.एस. / एन.ई.एफ टी. व्दारे थेट त्यांच्या बॅक खात्यामध्ये रक्कम मिळाल्याच्या १५ दिवसाच्या आत जमा करण्यात यावी** व त्याबाबतचा फी प्रतिपुर्तीचा लाभ मिळाल्याचे संबंधित विद्यार्थ्यांचे पावती / प्रमाणपत्र घ्यावे. तद्नंतर प्राप्त निधीचा उपयोग प्रस्तावित कारणांसाठीच करण्यांत आला असे उपयोगिता प्रमाणपत्र व लाभार्थी विद्यार्थ्यांचे वाटप विवरणपत्र (मुद्रांक पावत्यांसह) मंजूर रक्कम मिळाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आंत या कार्यालयास सादर करावे. अन्यथा एकुण देय रक्कमेच्या प्रतिदिनी १ टक्के प्रमाणे दंड वसूल करण्याची कार्यवाही करण्यांत येईल.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नागपूर.

प्रत — १. वरील संबंधीत सर्व संस्था प्रमुख, यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीस रवाना. त्यांना असे कळविण्यात येते की, त्यांनी त्वरीत सदर रक्कम संबंधीत विद्यार्थ्यांना त्यांच्या बॅक खात्यामध्ये ई.सी.एस. / एन.ई.एफ.टी. व्दारे जमा करुन तसा अहवाल या कार्यालयास रक्कम मिळाल्याच्या १५ दिवसाच्या आत सादर करावा.

२. अधिक्षक, शैक्षणिक विभाग, हेच कार्यालय यांना आवश्यक कार्यवाहीसाठी.

३. रोखपाल, हेच कार्यालय, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी त्यांना कळविण्यात येते की, वर्ष २०१०–११ करीता ई.बी.सी. साठी उपलब्ध असलेल्या अनुदाना मधुन वरीलप्रमाणे रक्कम सदर संस्थेच्या बॅक खात्यात ई.सी.एस. / एन.ई.एफ.टी. व्दारे सदर संस्थेकडून बॅक खात्याबाबतची माहिती प्राप्त झाल्यानंतर जमा करण्यात यावी.